# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते. मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ५ वे अंक ३६ गुरूवार दि.०७ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## रेणापूरात आ. रमेशआप्पा कराड यांचा साडेसात तास जनता दरबार अनेक प्रश्न

### जागेवरच सोडविले तर इतर प्रश्न महिनाभरात निकाली काढण्याच्या अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

लातूर :- लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी सर्वसामान्य जनतेचे प्रश्न आणि अडीअडचणी समजून घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेला रेणापूर तालुक्याचा जनता दरबार तब्बल साडेसात तास अखंडपणे सुरू होता. या जनता दरबारास अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. हजारो जणांनी आपले प्रलंबित असलेले प्रश्न आमदार महोदयासमोर मांडले. या सर्व प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन जे शक्य आहेत ते प्रश्न जागेवरच त्यांनी सोडविले. इतर प्रश्न संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याना तात्काळ कारवाई करून महिनाभरात निकाली काढण्याच्या सूचना दिल्या.







रेणापूर तालुक्यात पहिल्यांदाच लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी ५ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी तालुक्यातील गोरगरीब सर्वसामान्य माणसाचे दुःख, वेदना त्यांचे प्रश्न आणि अडीअडचणी समजून घेता याव्यात त्यांच्याशी संवाद साधता यावा यासाठी रेणापूर येथील रेणुकाई मंगल कार्यालयात जनता दरबार घेतला. या कार्यक्रमास संपूर्ण तालुकाभरातील जनतेने मोठा प्रतिसाद देत आपल्या अडीअडचणी आमदार महोदयासमोर मांडल्या. सकाळी ११ वाजता सुरू झालेला जनता दरबार सायंकाळी ६.३० वाजता संपला. तब्बल साडेसात तास अखंडपणे सुरू असलेल्या या जनता दरबारातून अनेकांचे प्रश्न मार्गी लागल्याने उपस्थित नागरिकांतून मोठे समाधान व्यक्त केले जात होते. पंधरा वर्षानंतर रमेशआप्पांच्या माध्यमातून जनतेतील आमदार बघायला मिळाला असल्याची अनेकांनी भावना व्यक्त केली तर लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या रेणापूर येथील बाजार समितीच्या परिसरात झालेल्या जनता दरबारची अनेकांनी आठवण केली.

. या जनता दरबारास उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, रेणापूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी प्रतिक लंबे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, नवनाथ भोसले, मंडल अध्यक्ष महेन्द्र गोडभरले, शरद दरेकर, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, सतीश आंबेकर, अनिल भिसे, अनंत चव्हाण, बाबासाहेब घुले, दशरथ सरवदे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थित होती. यावेळी विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक, महिला, पुरुष, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर ग्रामीण मतदार संघातून निवडून आलेले नवनिर्वाचित आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी मतदार संघात चार ठिकाणी जनता दरबार घेणार असल्याचे घोषित केले होते त्यानुसार मुरुड आणि ममदापूर नंतर तिसरा रेणापूर येथे जनता दरबार आयोजित करण्यात आला होता. प्रचंड मोठा प्रतिसाद मिळालेल्या या जनता दरबारमध्ये रेणापूरसह तालुकाभरातील विविध गावातील सर्व स्तरातील नागरिकांनी शेतरस्ते, घरकुल, समशानभूमी, शिव रस्त्यावरील अतिक्रमणे, शेतीतील वीजप्रश्न, कबाले, समाज मंदिर, बससेवा सुरू करणे, निराधारच्या पगारी, राशन दुकानचे प्रश्न, आरोग्य विषयक तक्रारी, विविध गावातील अवैध दारू विक्री व इतर अवैधधंदे, ग्रामसेवक, तलाठी गावात येत नाहीत यासह विविध प्रलंबित असलेल्या समस्या नागरिकांनी मुक्तपणे मांडल्या.

वाला येथील महिलांनी गावातील दारूबंदी तात्काळ बंद करण्याची आग्रहाची मागणी केली असता आ रमेशआप्पा कराड यांनी वाला गावासह रेणापूर तालुक्यात प्रत्येक गावातील अवैद्य दारू विक्री आणि अवैध धंदे तात्काळ बंद करण्याचे तसेच सिधंगाव येथील गाव गुंडाचा तात्काळ बंदोबस्त करण्याचा आदेश संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना दिला. अतिक्रमणे तात्काळ काढून सर्व रस्ते मोकळे करावेत, जनतेच्या मूलभूत प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, शासनाच्या विविध योजना पात्र गोरगरीब लाभार्थ्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत, तळागाळातील माणसाला न्याय द्यावा, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सेवक यांनी नियुक्ती दिलेल्या गावात जाऊन ग्रामस्थांच्या अडीअडचणी सोडवाव्यात अशा महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

जनता दरबाराच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाशी आ रमेशआप्पा कराड यांनी संवाद साधून त्यांचे प्रश्न समजून घेतले. जे शक्य आहे त्या प्रश्नांचा निर्णय जागेवरच केला इतर सर्वच निवेदनावर महिनाभरात कार्यवाही झालेली दिसेल अडचणीच्या विषयात निश्चितपणे योग्य तो मार्ग काढला जाईल असा दिलासाही आ. रमेशआप्पा कराड यांनी यावेळी अनेकांना दिला. प्रारंभी गटविकास अधिकारी सुमित जाधव यांनी जनता दरबार कार्यक्रमाचे प्रस्तावित केले तर शेवटी रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात यांनी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. याप्रसंगी रेणापूर तालुका भाजपाच्या वतीने आ रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या जनता दरबार कार्यक्रमास गोविंद नरहरे, विजय गंभीरे, कुलदीप सूर्यवंशी, अमर चव्हाण, नरसिंग चपटे, वसंत करमोडे, विजय चव्हाण, सुकेश भंडारे, श्रीकृष्ण पवार, अच्युत कातळे, श्रीकृष्ण जाधव, गणेश चव्हाण, दत्ता सरवदे, उत्तम चव्हाण, उज्वल कांबळे, लक्ष्मण यादव, रवींद्र नागरगोजे, नामदेव बोबडे, धनंजय पवार, सुनील चेवले, रमेश खाडप, महेश गाडे, किशन शिरसागर, दीपक पवार, संजय डोंगरे, ललिता कांबळे, अनुसया फड, शीला आचार्य, मनीषा मुंडे, राजकुमार आलापुरे, शेख अजीम, नाथराव गीते, रमाकांत फुलारी, दिनकर राठोड, ओम चव्हाण, आप्पासाहेब पाटील, रमेश चव्हाण, संतोष राठोड, भाऊसाहेब गुळबिले, श्रीमंत नागरगोजे, सिद्धेश्वर मामडगे, गोविंद देशमुख, बालाजी केंद्रे, अजित पाटील, नारायण राठोड, राज जाधव, शेख जलील, राजकुमार मानमोडे, सुरेश बुड्डे, बालाजी फड, संतोष चव्हाण, अजय राठोड, नारायण जोगदंड यासह रेणापूर तहसीलचे नायब तहसीलदार तानाजी यादव, प्रतीक्षा लांडगे, बांधकाम विभागाचे उप अभियंता एल. डी. देवकर, तालुका कृषी अधिकारी नितीन कांबळे, महावितरणचे उपअभियंता चांगदेव काळे, भूमि अभिलेखचे लांडेकर, तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी, राष्ट्रीय महामार्गचे निलेश मुंडे, राज्य परिवहन महामंडळाचे बाळासाहेब राठोड, आरटीओ प्रकाश मुळे महिला बालकल्याण विभागाचे साईनाथ वंगारे, रेणापूरचे पीआय दत्तात्रय निकम, चाकूरचे अच्युत सूर्यवंशी यांच्यासह लघु पाटबंधारे विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, पाणीपुरवठा विभाग, पशुधन विकास विभाग, गटशिक्षणाधिकारी, वन परिमंडळ अधिकारी जिल्हा रेशीम उद्योग, घरकुल आणि नरेगा विभागाचे अधिकारी, विस्तार अधिकारी, मंडल कृषी अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी अंगणवाडी पर्यवेक्षिका सर्व संबंधित अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिलेल्या आश्वासनांची पुर्तता न करणाऱ्या सरकारला जनता जाब विचारणार माजी आमदार धिरज देशमुख यांचे प्रतिपादन





टाका :-- राज्य सरकारने निवडणूकांमध्ये मोठ मोठी आश्वासने दिली होती. सत्ता स्थापन झाल्यावर त्या आश्वासनांचे पुढे काय झाले असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. त्यामुळे आपल्या प्रश्नांविषयी कानडोळा करणा-या सरकारला जनता नक्कीच जाब विचारणार असे प्रतिपादन माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी केले. लातूर ग्रामीण मधील टाका येथे आयोजित संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, संचालिका स्वयंप्रभा पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य नारायण लोखंडे, संत शिरोमणीचे चेअरमन शाम भोसले, व्हा चेअरमन सचिन पाटील, माजी चेअरमन गणपतराव बाजूळगे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, मांजरा कारखाना व्हा चेअरमन अशोकराव काळे, रेणाचे व्हा चेअरमन प्रविण पाटील, सदाशिव कदम, बाबासाहेब गायकवाड, पृथ्वीराज सिरसाठ, रघुनाथ शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले की, काँग्रेस पक्षाने केली नेहमीच जनतेच्या प्रश्नाला डोळ्यासमोर ठेवून आवाज उठवला आहे. लोकशाही मध्ये जनमताचा आदर हा प्रत्येकाने राखणे गरजेचे आहे मात्र विद्यमान सरकार तसे करताना दिसत नाही. शेतकरी कर्ज माफी करू असे सांगून त्या आश्वासनाचा साधा उल्लेख देखील केला जात नाही, लाडक्या बहिणींना २१०० रू देवू असे सांगितले मात्र त्यात देखील काही झाले नाही, शेतक-यांनी पिकवलेल्या मालास हमीभाव देवू असे सांगितले मात्र त्याचा देखील विसर सरकारला पडला आहे. हे सरकार जनहिताचे नसून या सरकारला जाब विचारायला हवा. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत राज्यातील जनता जाब विचारून धडा शिकवण्यासाठी आतूर असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महानगरपालिकेमार्फत बांधकाम साहित्य/ कचरा व्यवस्थापन संबंधी कार्यशाळा संपन्न ...



लातूर/ प्रतिनिधी: पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार व केंद्रीय आणि राज्य प्रदूषण नियंत्रण बोर्ड अंतर्गत राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम (National Clean -ir Programme) विभागा मार्फेत लातूर शहर महानगरपालिकेस लातूर शहरातील वायु, धुळ प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी करावयाच्या उपाय योजनांसाठी निधी प्राप्त होतो. सदर निधीतुन लातूर शहरातील हवा/वायु प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी अनेक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन C D Waste Management (बांधकाम साहित्य/ कचरा व्यवस्थापन) संबंधी कार्यशाळा अतिरिक्त आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०६.०८.२०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका कार्यालय, लातूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळे मध्ये नवीन बांधकाम करताना व जुने बांधकाम पाडताना वायू व धुळ प्रदूषण होणार नाही याबाबतच्या सर्व उपाययोजना सांगण्यात आल्या व बांधकामामधील वेस्ट मटेरीयल पासुन वेस्ट टु बेस्ट प्रोडक्ट तयार करण्यात येणार आहेत याची पण माहिती देण्यात आली सदर कार्यकार्यशाळेस श्रीमती. गीतांजली कौशिक, सल्लागार, NC-P यांच्या मार्फत कार्यशाळा विषयी मांडणी व प्रस्तावना केली तर अतिरिक्त आयुक्त तथा नोडल अधिकारी श्री. देविदास जाधव यांनी मार्गदर्शन केले, मनपातील कार्यकारी अभियंता श्री. विजयकुमार चव्हाण, पर्यावरण संवर्धन अधिकारी सन्मती मेस्त्री, शाखा अभियंता गणेश देवणीकर, NC-P विभागातील पंडीत लोहारे, मुख्य स्वच्छता अधिकारी, कलीम शेख, नगर रचना विभागातील नगर रचनाकार निरंजन मुस्के, मगर, ऐश्वर्या ढोकळे तसेच लातुर शहरातील बांधकाम क्षेत्रातील तज्ञ उदय पाटील, आदित्य शर्मा, विष्णु मदने, इंजिनियर शेख शफी, विश्वजीत मांडे, शेख एम एम, रिझवान गाडीवाले, तय्यब सय्यद तसेच प्राध्यापक, मेघा सरवदे, दयानंद कॉलेज लातूर हे उपस्थित होते.

## ‘दंत - वेदांता २०२५’ परिषदेमुळे दंत शाखेतील नवकल्पना आणि तंत्रज्ञानात भर पडेल डॉ. सुरेश कांगणे यांचा विश्वास; राज्यस्तरीय दंत - वेदांता २०२५ पदवीपूर्व परिषदेचे उद्घाटन






लातूर :- जिवनशैलीतील बदलामुळे मुख-दंत रोगांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. अत्याधुनिक उपचार पध्दती आणि तंत्रज्ञानांच्या माध्यमातून वाढत्या दंत रोगांवर मात करणे शक्य आहे. गेल्या काही वर्षांत सौंदर्यविषयक दंतचिकित्सा क्षेत्रात तांत्रिक, वैज्ञानिक नवकल्पना वेगाने विकसीत होत आहेत. दंत शाखेतील बदलते आयाम लक्षात घेवून ‘दंत वेदांता २०२५’ ही परिषद घेण्यात आली. या परिषदेच्या माध्यमातून दंत शाखेतील नवकल्पना आणि तंत्रज्ञानात आणखी भर पडेल असा विश्वास एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे यांनी व्यक्त केला. येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाच्या वतीने आयोजित एक दिवसीय राज्यस्तरीय ‘दंत वेदांता २०२५’ पदवीपूर्व परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे बोलत होते. यावेळी एमएसडीसी चे निरीक्षक डॉ. गणेश कोटलवार, उप प्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी, प्रमुख वक्ते कृत्रिम दंत रोपण तज्ज्ञ डॉ. सुशेन गांजरे, एण्डोडॉंटिक तज्ज्ञ डॉ. ऋषिकेश घुले, डॉ. अभिषेक बादाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. सुरेश कांगणे म्हणाले की, सौंदर्य दंतचिकित्सा: कला विज्ञान यांचा संगम या थीम आधारे परिषदेत सौंदर्यविषयक दंतचिकित्सा वाढवणाऱ्या नवीनतम प्रगती, तंत्रे आणि तंत्रज्ञानावर सखोल माहितीचे आदान प्रदान करण्यात येईल. त्याचबरोबर प्रमुख वक्त्यांची व्याख्याने, प्रत्यक्ष कार्यशाळा, पेपर आणि पोस्टर सादरीकरणे आणि आघाडीच्या चिकित्सक आणि शिक्षणतज्ज्ञांसह परस्पर संवादी पॅनेल चर्चासत्रांच्या माध्यमातून परिषदेत मंथन होणार आहे. एस्थेटिक दंतचिकित्सा ही दंतचिकित्साची एक शाखा म्हणून परिभाषित केली जाते जी रुग्णाच्या हास्याचे स्वरूप आणि एकूण सौंदर्यशास्त्र सुधारण्यावर लक्ष केंद्रित करते, दंतचिकित्साच्या भेटींबद्दलच्या धारणा भीती आणि वेदनांपासून सौंदर्य, तारुण्य आणि कार्यक्षमता वाढवणाऱ्या कलेच्या स्वरूपात रूपांतरित करते. या कार्यशाळेत डॉ. सुशेन गांजरे यांनी ‘सिरेमिक एस्थेटिक मॅक्सिमा’ विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. ऋषिकेश घुले यांनी ‘कंपोझिट व्हेनियर्स इंजेक्टेबल आणि प्रेडिक्टेबल पध्दत’ विषयावर तर डॉ. अभिषेक बादाडे यांनी ‘व्हाइट एस्थेटिक - लेसर व्दारे दात पांढरे करण्याची पध्दत’ विषयावर उपस्थित संशोधक विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्नेहा गणमुखी व डॉ. स्वातीलक्ष्मी नायर यांनी केले तर आभार डॉ. गौरी उगीले यांनी मानले. या कार्यशाळेसाठी राज्यभरातील दंत महाविद्यालयातील पदवीपूर्व विद्यार्थी, दंत चिकित्सक व एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील विभाग प्रमुख, शिक्षक कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी वैज्ञानिक समिती अध्यक्षा डॉ. गौरी उगीले, खजिनदार डॉ. वर्षा सांगळे, नोंदणी प्रमुख डॉ. शशी पाटील, वैज्ञानिक सत्र समन्वयक डॉ. अभय कुलकर्णी, माध्यम प्रमुख डॉ. सुजित झाडके, माहिती तंत्रज्ञान प्रमुख डॉ. स्नेहा गणमुखी यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय

# महिला अद्यापही चौकटीतच!

महिलांच्या सुरक्षेबाबत उठणार्या प्रश्नांवर सरकारे सामान्यतः भविष्यात सर्व काही सुरळीत होईल, अशा आश्वासनांची औपचारिकता पाळण्यात धन्यता मानतात; पण जेव्हा प्रत्यक्षात काही ठोस कृती करण्याचा विषय येतो, तेव्हा खरी स्थिती समोर येते. महिलांच्या सुरक्षेसाठी चालवण्यात येणार्या मोहिमांमध्ये कधी स्पष्ट दृष्टिकोनाचा अभाव जाणवतो, तर कधी बेफिकिरीचे दर्शन घडते. अनेकदा महिलांविरुद्ध होणार्या गुन्ह्यांसाठी त्यांनाच जबाबदार धरण्याचे प्रकारही या देशात घडतात.

विधिषा देशपांडे गुजरातमधील अहमदाबादमध्ये वाहतूक पोलिसांच्या वतीने सुरक्षा मोहिमेसाठी कथितपणे जे पोस्टर लावले गेले होते, त्यामध्ये बलात्कार किंवा सामूहिक बलात्कार टाळण्यासाठी महिलांना 'उशिरा रात्री पार्टीला जाऊ नये' किंवा 'मित्रासोबत अंधार्या आणि सुनसान जागी जाऊ नये' असा सल्ला दिला होता. हे महिलांविरुद्ध होणार्या भीषण गुन्ह्यांकडे पाहण्याचा रुढीवादी, संकुचित आणि प्रतिगामी दृष्टिकोन उजागर करणारे आहे.

अपेक्षेप्रमाणे हे प्रकरण गाजू लागले तेव्हा अहमदाबाद वाहतूक पोलिसांनी स्पष्टीकरण दिले की, अशा संदेशांचे पोस्टर त्यांच्या वतीने लावले गेलेले नाहीत. असे उत्तर दिल्याने आपण हात झटकून मोकळे होऊ असा पोलिसांचा कयास असावा; पण यामुळे उलट अधिक प्रश्नांचा भडिमार होऊ लागला. वाहतूक पोलिसांच्या माहितीशिवाय किंवा संमतीशिवाय एखाद्या कथित स्वयंसेवी संस्थेने असे पोस्टर लावले असतील, तर सार्वजनिक ठिकाणी लावण्यापूर्वी कोणत्याही जबाबदार अधिकार्याने त्याची तपासणी का केली नाही? आपल्या समाजातील सामाजिक मानसिकतेचे दर्शनही यातून घडले. महिलांच्या सुरक्षेसाठी काम करणार्या एखाद्या स्वयंसेवी संस्थेचा दृष्टिकोनही असा संकुचित असेल तर त्यातून स्त्रियांचे सक्षमीकरण होणार कसे? ज्या संस्था आणि सरकारी यंत्रणा महिलांच्या सुरक्षेसाठी काम करतात, त्यांच्यात एखाद्या गुन्ह्याच्या बाबतीत पीडितेलाच आरोपीच्या पिंजर्यात उभे करू नये, इतकीही मूलभूत संवेदनशीलता आणि समज नाही हे दुर्दैवी आणि चिंताजनक आहे.

काही आठवड्यांपूर्वी पृथ्वीच्या वातावरणापासून दूर, अवकाशात असणार्या अंतराळस्थानकावर जाऊन, राहून सुनीता विल्यम्स नावाची साहसी अंतराळवीर सुखरुपरित्या पृथ्वीवर परतली. तिच्या या कृतीने महिलांमधील क्षमतेचे अत्युच्च दर्शन जगाला घडले. अशा स्थितीत आपण त्यांना मसातच्या आत घरातफ या पारंपरिक मानसिकतेत अडकवून ठेवण्याचा प्रयत्न करणार असू, तर या यशावर पाणी फिरवण्यासारखे आहे.

अहमदाबादमधील कथित पोस्टर प्रकरणाने फक्त प्रशासनातील असंवेदनशीलता उघड केली नाही, तर आपल्या समाजातील खोलवर रुजलेली मानसिकताही समोर आणली आहे. महिलांवर अत्याचार झाल्यास, सर्वप्रथम त्यांच्याच वर्तनावर प्रश्नचिन्ह उभे केले जाते. रात्री बाहेर का गेल्या?, कपडे कसे होते?, मित्रासोबत का होत्या? हे प्रश्न पीडितेच्या ऐवजी जणू आरोपीला संरक्षण देतात. यातून ध्वनित होणारा अर्थ असा की, सुरक्षिततेची जबाबदारीही महिलांनीच घ्यायची आणि पुरुषांच्या गुन्हेगारी वृत्तीला अप्रत्यक्ष पाठींबा द्यायचा. या मानसिकतेला समाजातील काही स्वयंसेवी संस्था आणि कधी-कधी पोलीस प्रशासनही हातभार लावते, हेच अधिक चिंताजनक आहे. यामुळे मुलींमध्ये भीती निर्माण होते आणि त्यांच्या स्वप्नांवर मर्यादा येते. खरी सुरक्षा म्हणजे महिलांनी बंधनात राहणे नव्हे, तर समाजाने महिलांसाठी सुरक्षित वातावरण तयार करणे होय.

# निम्मा देश पाण्याखाली

देशाच्या विविध भागांमध्ये सध्या भीषण पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, अरुणाचल प्रदेश, बिहार, हिमाचल प्रदेश या राज्यांना पावसाने मोठा तडाखा दिला असून हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये तर गेले अनेक आठवडे ही भीषण स्थिती कायम आहे. उत्तर प्रदेशच्या मैदानी भागात गंगा, यमुना आणि अन्य नद्यांच्या पाण्यामुळे अनेक ठिकाणचा सखल भूप्रदेशही पाण्याखाली आला आहे. वाराणसीत भीषण स्थिती निर्माण झाली असून निम्मे प्रयागराज पाण्याखाली गेल्याचे चित्र दूरचित्रवाहिन्यांवर पाहायला मिळते आहे. उत्तर प्रदेशातील बुंदेलखंड, फतेहपूर, चंदोली अशा अनेक भागात मोठी आव्हानात्मक स्थिती निर्माण झाल्याच्या बातम्या आहेत. बिहारमध्येही अनेक ठिकाणी अशीच स्थिती असून खुद्द राजधानी पाटणा शहरालाही पुराचा तडाखा बसला आहे.

याखेरीज गुजरातचा काही भाग, पश्चिम बंगालचा काही भाग पावसाच्या तडाख्यात सापडला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले असून शेती आणि पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी घरांचीही मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. उत्तर प्रदेशात प्रयागराजसारख्या ठिकाणी 'एनडीआरएफ'ची पथके तैनात केली गेली आहेत; पण जवळपास निम्मे शहर पाण्याखाली गेल्याने सरकारी मदत सामग्री आणि यंत्रणा अपुरी पडत आहे. या सगळ्या परिस्थितीचा सामना करणार्या राज्य सरकारांना अशा संकटकाळात केंद्राकडून मदत मिळणे अपेक्षित असते.



किंबहुना केंद्रीय पातळीवरून या स्थितीकडे बारकाईने लक्ष ठेवले जाते आणि आवश्यक तिथे तातडीची मदत पाठवली जाते, पण गेले दोन-चार दिवस या ज्या पुराच्या सततच्या बातम्या येत आहेत त्यात कोठेही केंद्र सरकारकडून या आपत्तीची गांभीर्याने दखल घेतल्याचे जाणवत नाही. किंबहुना केंद्र सरकारला या नैसर्गिक आपत्तीची कल्पना आहे की नाही अशी शंका यावी अशीच स्थिती सध्या दिसते आहे. दिल्लीत संसदेचे अधिवेशन सुरू आहे. त्यामुळे सरकार पुढे तिथे वेगळी आव्हाने निर्माण झाली आहेत. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी बिहारमधील मतदार याद्यांच्या पुनरावलोकनाच्या विरोधात आपले आंदोलन सुरूच ठेवले असून आजही तेथे संसद कामकाजात यावरून गदारोळ पाहायला मिळाला. त्यामुळे आजही कामकाज तहकूब करावे लागले.

या संसद कामकाजामुळे सरकारला बहुदा देशातील पूरस्थितीकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नसावा. दुसरीकडे, अमेरिकेने भारतीय मालावर जो २५% ज्यादाचा कर लावला आहे त्यातून निर्माण झालेले आव्हानही मोठे आहे. रशियाकडून तेल आयात करायला अमेरिकेने भारताला बंदी केली आहे, या पार्श्वभूमीवर काही युरोपियन देशांनी भारताकडून रिफाइंड तेल घ्यायचे नाही असा निर्णय घेतला आहे. असे एका पाठोपाठ एक आव्हानात्मक विषय समोर असल्यामुळे सरकारला बहुधा देशांतर्गत पूरस्थितीकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नसावा. त्या त्या राज्यातील पूरस्थितीचा मुकाबला करण्याची जबाबदारी त्या त्या राज्यांवरच सोपवून केंद्र सरकार स्वस्थ बसलेले दिसत आहे.

तथापि, हिमाचल प्रदेशसारख्या राज्याचा विचार केला तर त्या राज्याला गेल्या अनेक महिन्यांपासून गंभीर नैसर्गिक आपत्तीचा सातत्याने सामना करावा लागत आहे. या आपत्तीचा सामना करताना हिमाचल प्रदेशसारख्या छोट्या राज्याचे आर्थिक कंबरडे साफ मोडून गेल्याचेही दिसते आहे. त्यामुळे हिमाचल प्रदेशने केंद्राकडे मदतीसाठी वारंवार याचना केली असली, तरी केंद्र सरकारने त्यांच्याकडेही लक्ष दिलेले नाही. मुळात विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांकडे लक्षच द्यायचे नाही असा केंद्रातील भाजप सरकारचा खाक्या असला, तरी अनेक भाजपशासित प्रदेशातही आता पूरस्थितीचे आव्हान निर्माण झाले आहे. भाजपचे सरकार असलेल्या उत्तराखंडलाही या स्थितीचा सामना करताना मोठीच आर्थिक टंचाई निर्माण झाली आहे; पण त्या राज्याकडे तरी केंद्राचे लक्ष आहे असे पाहायला मिळत नाही.

केंद्र सरकार स्वतःच आर्थिक अडचणीत असेल, तर अशा परिस्थितीत आपद्ग्रस्त राज्यांना मदत करताना केंद्राला दहा वेळा विचार करावा लागतो ही गोष्ट खरी आहे. पण सरकारचा दावा तर आर्थिक परिस्थिती उत्तम असल्याचा आहे, मग अशा परिस्थितीत सरकार मदतीचा हात का आखडता घेत आहे असा स्वाभाविकच प्रश्न निर्माण होतो. निदान आपद्ग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी केंद्रीय पातळीवरून तातडीचा संपर्क साधून समन्वय प्रस्थापित करणे आणि त्यांच्या नेमक्या गरजा लक्षात घेणे सहज शक्य आहे. पंतप्रधान आणि गृहमंत्री वेगवेगळ्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी व्यस्त असले तरी केंद्रातील काही ज्येष्ठ मंत्र्यांकडे विशेषतः अर्थमंत्र्यांकडे स्वतंत्र जबाबदारी सोपवून या राज्यांना मदतीचा हात देण्याची खबरदारी सरकारने पार पाडायला हवी.

परंतु तशीही कोणती हालचाल सध्या सुरू असल्याचे पाहायला मिळत नाही. महाराष्ट्रातही कोल्हापूर, सांगली सारख्या भागात पूरजन्य स्थिती आहे. मात्र, तेथे देशातल्या अन्य राज्यांप्रमाणे फार नुकसान झालेले नाही. सध्याचे हवामानाचे चित्र पाहता आणखी काही दिवस देशाच्या विविध भागाला पावसाचा मोठा तडाखा बसण्याची शक्यता आहे त्यामुळे केंद्र सरकारने आता संसद अधिवेशन आणि बाकीच्या विषयातून थोडा वेळ काढून पूरग्रस्त राज्यात जे लाखो लोक बाधित झाले आहेत त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे आणि संबंधित राज्यांना आर्थिक मदतीचाही हात दिला पाहिजे.

# गरज हत्ती संवर्धनाची

जंगलामधील प्राणी जीवनामध्ये हत्तींचे महत्त्व हे अनन्यसाधारण आहे. त्यामुळे आता त्यांच्या संवर्धनाची गरज आहे. सध्या दंडकारण्यातून कोकणच्या सह्याद्री पर्वतांमध्ये दाखल झालेल्या हत्तींमुळे मानव विरुद्ध हत्ती संघर्ष उभा राहिला आहे. याचे मूळ कारण हत्तींकडून बागायतींचे होणारे मोठे नुकसान हे आहे. नारळी, पोफळीच्या बागा हत्ती उद्ध्वस्त करत असल्याने हत्तींचा बंदोबस्त करावा, यासाठी शेतकरी आक्रमक आहेत.

पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणच्या सीमारेषेवरील जंगलांमध्ये अलीकडच्या २५ वर्षांत हत्तींचा मोठा अधिवास पाहायला मिळतो. भारतातील पानगळीच्या जंगलात आशियाई हत्तींचा वावर आहे. एक हत्तींचा कळप २० ते ५० किलोमीटर भागात अधिवास करतो. २५ वर्षांपूर्वी सुरुवातीला जेव्हा हत्ती दाखल झाले तेव्हा गणपतीचा अवतार आला म्हणून सर्वांनीच हत्तीचे स्वागत केले होते. मात्र, हत्तींचा उपद्रव वाढला आणि संघर्षाची ठिणगी पडली. त्या काळात हत्ती हटाव मोहिमाही राबविण्यात आल्या. काही हत्तींना पकडण्याचे प्रयत्न झाले. यात काही हत्तींचा मृत्यू झाला. काही हत्ती गोळीबारात मारले गेले; पण हत्तींचे कळप या भागात येतच राहिले. तिलारीचे विशाल जलाशय, मुबलक हिरवा चारा, यामुळे हत्ती या भागात आकर्षिले गेले. मात्र, हत्तींना जेव्हा जंगलात पुरेसे खाद्य मिळत नाही, तेव्हा ते बागायतींवर आक्रमण करतात.



नारळी, पोफळीची झाडे उद्ध्वस्त करू लागतात. मात्र, यावर उपाय काय? असा प्रश्न सतावू लागतो. असाच संघर्ष श्रीलंकेतही सुरू झाला होता. त्यावेळी हत्तींच्या अधिवासाची कल्पना पुढे आली. भारतातही असे प्रयत्न होऊ शकतात.

हत्तींसाठी अभयारण्य, असा एक विषय मध्यंतरीच्या काळात चर्चिला गेला. खरे तर एखाद्या जंगलात हत्ती येणे हा समृद्ध प्राणी क्षमतेचा सिम्बॉल आहे. पश्चिम घाटात मोठ्या प्रमाणावर वनौषधी आहेत. या वनौषधी हत्तींचे खाद्य आहे. ते पश्चिम घाटात विपुल प्रमाणात आहे. मात्र, त्यांच्या अधिवासाचे क्षेत्र तयार केले नसल्याने हत्ती मनुष्य वस्तीत येऊ लागले आहेत. जंगलांचे पुनरुज्जीवन, अन्न साखळीचे जतन अशा गोष्टींवर भर देऊन हत्तींसाठी संरक्षित कॉरिडोर निर्माण केला जाऊ शकतो. व्याघ्र प्रकल्पांप्रमाणे आज हत्ती अभयारण्याचीही गरज निर्माण झाली आहे. आशियाई हत्ती हा तीन मान्यताप्राप्त उपप्रजातींपैकी एक आहे. हत्तींच्या संवर्धनातून जंगलात काही सकारात्मक गोष्टीही घडू शकतात. सध्याच्या हत्ती-मानव संघर्षात दोन्ही बाजूंची मोठी हानी होताना दिसत आहे.

वीरप्पन हा हत्ती मारून हस्तिदंत विकून त्या काळात मोठ्या प्रमाणात पैसा मिळवत होता. आता कोकण अर्थात पश्चिम घाट ते अरबी समुद्र या मैदानी पट्ट्यामध्ये हत्तींचा अधिवास विस्तारत आहे. हेच आजच्या संघर्षाचे मुख्य कारण आहे. हा संघर्ष रोखण्यासाठी हत्तींचा अधिवास निश्चित करणे आजची गरज झाली आहे. गेल्या काही वर्षांपासून हत्तींच्या संवर्धनाची गरज तीव्रतेने जाणवत आहे. मानव-हत्ती संघर्ष, शिकार, प्राण्यांच्या प्रदेशावर मानवी वस्त्यांचे अतिक्रमण, यामुळे हा संघर्ष तीव्र झाला आहे. भारतातही काही भागात हत्ती अभयारण्ये तयार करणे शक्य आहे. यापूर्वी झारखंडमध्ये सिंहभूम हत्ती अभयारण्य हे भारतातील पहिले हत्ती अभयारण्य उभे राहिले. याच धर्तीवर पश्चिम घाटात अभयारण्य उभे करणे शक्य झाले. हे हत्ती अभयारण्य, २००१ मध्ये झारखंडमध्ये स्थापन झाले. अशाच स्वरूपात व्याघ्र आणि हत्ती अभयारण्य उभे करण्याची योजना आखली होती. मात्र, सध्या तरी हा मुद्दा कागदावरच आहे.

# मेंदूच्या पेशी कायमच निरोगी ठेवण्यासाठी आहारात करा ‘या’ पदार्थांचा समावेश, स्मरणशक्तीत होईल चांगली वाढ

दीर्घकाळ निरोगी राहण्यासाठी शरीराला आवश्यक पोषक घटकांची आवश्यकता असते. शरीरातील विटामिन, प्रोटीन, जीवनसत्वे, कॅल्शियम योग्य प्रमाणात असणे आवश्यक आहे. शरीरासोबतच मेंदूच्या आरोग्याची सुद्धा जास्त काळजी घेणे गरजेचे आहे. मेंदू शरीरातील सगळ्यात महत्वाचा अवयव आहे. मेंदूच्या कार्यात अडथळे निर्माण झाल्यानंतर संपूर्ण शरीराचे कार्य थांबते. त्यामुळे मेंदूच्या कार्यात कोणतेही अडथळे येऊ नये म्हणून शरीराची जास्त काळजी घ्यावी. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला मेंदूच्या पेशी कायमच निरोगी ठेवण्यासाठी आहारात कोणत्या पदार्थांचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या पदार्थांच्या सेवनामुळे रणशक्ती वाढते, लक्ष केंद्रीत करण्यास मदत होते आणि वय वाढल्यानंतर सुद्धा मेंदू कायमच सक्रिय राहतो.




ब्लूबेरी: आंबट गोड चवीची ब्लूबेरी सगळ्यांचं खूप जास्त आवडते. ब्लूबेरी खाल्यामुळे आरोग्य सुधारते. ब्लूबेरीमध्ये मोठ्या प्रमाणावर अँटीऑक्सिडंट आढळून येतात. याशिवाय ब्लूबेरीचे सेवन तुम्ही नुसतेच सुद्धा करू शकता. ब्लूबेरी खाल्यामुळे मेंदूच्या कार्यात अडथळे निर्माण होत नाहीत. यासोबतच मेंदू कायम सक्रिय राहतो.

संत्री: संत्री खायला सगळ्यांचं खूप जास्त आवडतात. वर्षाच्या बाराही महिने बाजारात संत्री उपलब्ध असतात. त्यामुळे संत्र्याचा रस किंवा संत्र तुम्ही खाऊ शकता. यामध्ये असलेले विटामिन सी मेंदूच्या आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. तसेच फ्री रॅडिकल्सपासून मेंदूचा बचाव करण्यासाठी नियमित एक संत्र खावे. मात्र सकाळी उपाशी पोटी संत्र्याचे सेवन करू नये.

हळद: जेवणातील सर्वच पदार्थ बनवताना हळदीचा वापर केला जातो. हळदीमध्ये असलेले अँटी-बॅक्टेरिअल आणि अँटी-इन्फ्लामेटरी गुणधर्म आरोग्यासाठी अतिशय प्रभावी ठरतात. तसेच हळदीमध्ये असलेले क्यूमिन शरीरात वाढलेली जळजळ, सूज कमी करण्यासाठी मदत करते. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी हळदीच्या पाण्याचे सेवन करावे. तसेच हळदीच्या दुधाचे सेवन करणे सुद्धा आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.

डार्क चॉकलेट: लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं डार्क चॉकलेट खायला खूप जास्त आवडते. डार्क चॉकलेट खाणे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. नियमित एक तुकडा डार्क चॉकलेट खायल्यामुळे मेंदूचे आरोग्य सुधारते. यामध्ये असलेले फ्लेवोनॉइड्स आणि कॅफीन मूड सुधारण्यास मदत करतात.

पोटात वाढलेली उष्णता क्षणार्धात होईल कमी! ‘या’ हिरव्यागार पानांच्या रसाचे नियमित करा सेवन, शरीराला होतील अनेक फायदे

F-Qs (संबंधित प्रश्न)

मेंदूच्या आरोग्यासाठी काय चांगले आहे?

नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेसा आराम, आणि मानसिकदृष्ट्या सक्रिय राहणे मेंदूसाठी चांगले आहे. नियमितपणे नवीन गोष्टी शिकणे, आव्हानात्मक कामे करणे, आणि सामाजिकमध्ये सहभागी होणे मेंदूला उत्तेजित करते.

मेंदूच्या आरोग्यासाठी काय वाईट आहे?

धूम्रपान, अति मद्यपान, आणि अस्वास्थ्यकर आहार मेंदूसाठी हानिकारक आहेत. तसेच, जास्त ताण (stress), अपुरी झोप, आणि मानसिकदृष्ट्या निष्क्रिय राहणे देखील मेंदूसाठी हानिकारक आहे.

मेंदूच्या आरोग्यासाठी विशेष आहार?

संतुलित आणि पौष्टिक आहार मेंदूसाठी महत्त्वाचा आहे. फळे, भाज्या, मासे, आणि नट्स (nuts) यांसारख्या गोष्टी मेंदूसाठी फायदेशीर आहेत, असे एका आरोग्य संस्थेने नमूद केले आहे.

# दैनंदिन व्यवहारातून आदर्श प्रस्थापित करणे हेच माझे कर्तव्य..! *समाजभूषण उत्तमराव तरकसे

मुंबई:- परळ मुंबई येथील दामोदर सभागृहा जवळील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात गुन्हे शाखेतील विद्वान साहित्यिक अंतरराष्ट्रीय संस्थेचा सल्लागार नियुक्त. महाराष्ट्र पोलीस दलातील गुन्हे शाखेत कार्यरत श्री उत्तम दासु तरकसे यांची विविध देशात नावारूपास आलेल्या विजन इंडिया तथा वेद फाउंडेशन संस्थेच्या लीगल डव्हायझर पदी नियुक्ती घोषित करण्यात आली. सदर नियुक्ती दोन महिने पूर्व करण्यात आली होती परंतु गुन्हे शाखेतील वरिष्ठांनी सोपवलेल्या अत्यंत महत्त्वाच्या अशा उत्तर प्रदेश राज्यातून आरोपींना शिफाईतीने ताब्यात घेऊन महाराष्ट्र राज्यात आणण्याचे जिकरीचे कार्य त्यांच्यावरती सोपविण्यात आले होते आणि त्यांनी ते अथक परिश्रमातून यशस्वी करून दाखविले.



सदर महत्त्वपूर्ण जबाबदारी पश्चात आज त्यांची संस्था अध्यक्ष स्वप्निल राणि नंदकुमार यांनी विशेष भेट घेत त्यांचे नियुक्ती पत्र सन्मानपूर्वक सोपविले. उत्तम तरकसे हे नावाप्रमाणेच उत्तम व्यक्ती असून केवळ गुन्हे शाखेतील सक्षम अधिकारी ही ओळख ठेवत उत्तम साहित्यिक आणि उत्तम समुपदे म्हणून त्यांनी त्यांचा कर्तृत्व गाजवलेल आहे तसेच विविध समारोपात समाज उपयोगी भाषणे करून प्रत्यक्षात समाजकार्य करण्यावर त्यांचा भर आहे गत पाच वर्षाहून अधिक वास्तविक सामाजिक कार्याशी निगडित असलेल्या संस्थेचा सदस्य म्हणून त्यांच्यावरती लीगल डव्हायझर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे आणि सदर जबाबदारी सोपवताना बाहरेन राजसत्ता सौदी अरब राजसत्ता यासारख्या देशातून कार्यरत असलेल्या विश्वस्तांनी देखील त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे असे प्रतिपादन या वेळेला संस्थाध्यक्ष स्वप्निल आणि नंदकुमार यांनी केले. सत्काराला उत्तर देताना दैनंदिन व्यवहारातून आदर्श प्रस्थापित करणे हेच माझे कर्तव्य आहे असे वक्तव्य श्री तरकसे यांनी केले. सन्मान आयोजन प्रसंगी विजन इंडिया डॉक्युमेंटरी इथे प्रमुख संपादक श्री राहुल गायकवाड विशेष उपस्थित होते

## राहुल म्हणाले- ट्रम्प धमकावत आहेत, मोदी सामना करण्यास असमर्थ:अदानींविरुद्ध अमेरिकेत सुरू असलेल्या चौकशीमुळे त्यांचे हात बांधलेले

नवी दिल्ली- काँग्रेस खासदार राहुल गांधी म्हणाले की, पंतप्रधान मोदी ट्रम्प यांच्या धमक्यांपुढे टिकू शकत नाहीत. याचे कारण म्हणजे अदानींविरुद्ध अमेरिकेत चौकशी सुरू आहे. अशा परिस्थितीत मोदींचे हात बांधलेले आहेत. मोदींचे --- (अदानी-अंबानी) शी काय संबंध आहेत, हे उघड झाले आहे.

गेल्या वर्षी अमेरिकेत अदानींसह ८ जणांवर अब्जावधी रुपयांच्या फसवणुकीचा आरोप होता. अमेरिकन ॲटर्नी ऑफिसच्या आरोपपत्रानुसार, अदानी यांच्या कंपनीने भारतात अक्षय ऊर्जा प्रकल्प अनुचित मार्गाने मिळवले होते. यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना लाच देण्यात आली होती. चौकशी सुरू आहे.



ट्रम्प यांच्या दाव्यांवरून राहुल यांनी पंतप्रधानांना घेरले, २ प्रकरणे...

३१ जुलै: राहुल म्हणाले- भारतीय अर्थव्यवस्था मृतावस्थेत, मोदींनी ती मारली अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला मृत अर्थव्यवस्था म्हटले- यावर काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी गुरुवारी म्हटले - अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी वस्तुस्थिती सांगितली याचा मला आनंद आहे. राहुल गांधी यांनी गुरुवारी सांगितले की, संपूर्ण जगाला माहित आहे की भाजपने अदानींना मदत करण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली आहे. ट्रम्प बरोबर आहेत. पंतप्रधान मोदी आणि अर्थमंत्र्यांशिवाय सर्वांना माहित आहे की भारताची अर्थव्यवस्था मृत आहे.

२८ जुलै: राहुल म्हणाले- तुमच्यात हिंमत असेल तर पंतप्रधानांनी ट्रम्प खोटारडे आहेत असे म्हणावे लोकसभेत दुसऱ्या दिवशी ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेदरम्यान काँग्रेस खासदार राहुल गांधी म्हणाले- ट्रम्प यांनी २९ वेळा म्हटले आहे की आम्ही युद्ध थांबवले. जर त्यांच्यात हिंमत असेल तर पंतप्रधानांनी सभागृहात सांगावे की ते खोटे बोलत आहेत.

राहुल म्हणाले- जर पंतप्रधान मोदींकडे इंदिरा गांधींच्या ५० टक्केही ताकद असेल तर सांगा की ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताचे एकही लढाऊ विमान पडले नाही. पंतप्रधान ज्या पद्धतीने त्यांची प्रतिमा वाचवण्यासाठी सशस्त्र दलांचा वापर करत आहेत ते देशासाठी धोकादायक आहे.

ट्रम्प आज भारतावर आणखी कर लादू शकतात ट्रम्प आज भारतावर आणखी कर लादण्याची घोषणा करू शकतात. काल, म्हणजे मंगळवारी, त्यांनी सांगितले होते की ते २४ तासांच्या आत भारतावर मोठे कर लादणार आहेत. ट्रम्प यांनी ३० जुलै रोजी भारतावर २५% कर लादण्याची घोषणा केली होती.

त्यांनी म्हटले होते की, भारत रशियासोबत व्यवसाय करून युक्रेनविरुद्ध रशियन युद्धयंत्रणेला इंधन देत आहे. यामुळे अमेरिकेला कठोर कारवाई करण्याची गरज आहे.

याच्या एक दिवस आधी त्यांनी म्हटले होते की भारत रशियाकडून स्वस्त तेल खरेदी करत आहे आणि ते खुल्या बाजारात विकत आहे. रशियाच्या हल्ल्यामुळे युक्रेनमध्ये किती लोक मारले जात आहेत याची भारताला पर्वा नाही. या कारणास्तव, मी भारतावरील शुल्क मोठ्या प्रमाणात वाढवीन.

युक्रेन युद्धापूर्वी, भारत रशियाकडून फक्त ०.२% (प्रतिदिन ६८ हजार बॅरल) तेल आयात करत होता. मे २०२३ पर्यंत ते ४५% (प्रतिदिन २० लाख बॅरल) पर्यंत वाढले, तर २०२५ मध्ये जानेवारी ते जुलै या कालावधीत, भारत रशियाकडून दररोज १७.८ लाख बॅरल तेल खरेदी करत आहे.

गेल्या दोन वर्षांपासून, भारत दरवर्षी १३० अब्ज डॉलर्स (११.३३ लाख कोटी रुपये) पेक्षा जास्त किमतीचे रशियन तेल खरेदी करत आहे.

# लातूर जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर :- राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत ‘टीबीमुक्त गाव माझी जबाबदारी - टीबीमुक्त ग्रामपंचायत’ अभियान राबविले जात आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभागी होऊन लातूर जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. ‘टीबीमुक्त गाव माझी जबाबदारी’ अभियानांतर्गत सलग दोन वर्षे क्षयरोगमुक्त राहिलेल्या ३२ ग्रामपंचायतींचा ‘सिल्व्हर अवॉर्ड’ (रौप्य पुरस्कार) देऊन गौरव करण्यात आला. हा गौरव सोहळा मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, जागतिक आरोग्य संघटनेचे सल्लागार डॉ. कौस्तुभ दासगुप्ता, जिल्हा क्षयरोग केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. अलका बांगर आणि सांख्यिकी अन्वेषक श्रीमती किरण चोथे आदी उपस्थित होते.





जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. प्रशासकीय स्तरावर क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्यांना मोफत औषधोपचार दिले जात आहेत. तसेच, रुग्णांना पोषण आहार मिळावा यासाठी पोषण आहाराचे वाटप केले जाते. ग्रामपंचायत स्तरावर क्षयरुग्णांचा शोध, त्यांना पोषक आहार पुरवणे यासारख्या बाबींसाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. सलग दोन वर्षे एकही क्षयरुग्ण आढळून न आलेल्या ३२ ग्रामपंचायतींचा सन्मान हा इतर ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील २६९ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्या असून, सलग दोन वर्षे क्षयरोगमुक्त राहिलेल्या ३२ ग्रामपंचायतींना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते महात्मा गांधी यांची प्रतिमा आणि प्रमाणपत्र देऊन ‘सिल्व्हर अवॉर्ड’ प्रदान करण्यात आला. पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचे सरपंच, गटविकास अधिकारी आणि तालुका आरोग्य अधिकारी यांनी पुरस्कार स्वीकारले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे यांनी केले.

## १० मिनिटांमध्ये झटपट बनवा कोकणातील पारंपरिक पदार्थ काकडी पोहे, पचनक्रिया राहील कायमच निरोगी

सकाळच्या नाश्त्यात नेहमीच काय बनवावं? असा प्रश्न सर्वच गृहिणींना पडतो. नाश्त्यात कांदापोहे, उपमा, शिरा खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा सगळ्यांचं होते. अनेक घरांमध्ये अजूनही सकाळच्या नाश्त्यात चहा आणि पोहे खाल्ले जातात. कारण घाईगडबडीमध्ये नाश्त्यात काय हे सुचत नाही. सकाळच्या नाश्त्यात कायमच हेल्दी आणि टेस्टी पदार्थांचे सेवन करावे. पोटभर नाश्ता केल्यामुळे संपूर्ण दिवस आनंद आणि उत्साहामध्ये जातो. याशिवाय शरीरातील थकवा कमी होण्यास मदत होते. कोकणात बनवले जाणारे पारंपरिक पदार्थ जगभरात सगळीकडे प्रसिद्ध आहे. ओल खोबर आणि घरातील पारंपरिक पदार्थांचा वापर करून अनेक नवनवीन पदार्थ बनवले जातात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला कोकणातील पारंपरिक पद्धतीमध्ये काकडी पोहे बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. काकडी खाल्यामुळे पोटात वाढलेली उष्णता कमी होते आणि पचनक्रिया सुधारते. याशिवाय पोहे पचनासाठी अतिशय हलके असतात. चला तर जाणून घेऊया काकडी पोहे बनवण्याची सोपी रेसिपी.





साहित्य:
- काकडी
- पोहे
- ओल खोबर
- मीठ
- चणा डाळ
- उडीद डाळ
- शेंगदाणे
- हिरवी मिरची
- कढीपत्ता
- लाल सुक्या मिरच्या

कृती: काकडी पोहे बनवण्यासाठी स्वच्छ करून घेतलेले पोहे पाण्याने धुवून काहीवेळ पाण्यात भिजत ठेवा. त्यानंतर लगेच पोह्यांमधील पाणी काढून चाळणीमध्ये ठेवा.

कढईमध्ये तेल गरम करून त्यात चण्याची डाळ, पांढर्या उडदाची डाळ, हिंग, शेंगदाणे आणि मुगाची डाळ घालून व्यवस्थित लाल होईपर्यंत भाजा.

त्यानंतर त्यात बारीक चिरलेल्या लाल सुक्या मिरच्या, हिरव्या मिरच्या आणि कढीपत्त्याची पाने घालून मिक्स करा. तयार केलेल्या फोडणीमध्ये पोहे टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या. नंतर त्यात किसलेली काकडी, ओल्या खोबऱ्याचा किस आणि आवडीनुसार साखर टाकून मिक्स करा. तयार आहेत सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली काकडी पोहे. हा पदार्थ लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप जास्त आवडेल.

# समाजभूषण उत्तम तरकसे यांचा सन्मान



नवी मुंबई:- लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर यांच्यावतीने मराठी साहित्य संस्कृती कला मंडळ सभागृह वाशी नवी मुंबई येथील संदेश विठ्ठल उमाप व प्रवीण शशिकांत डोणे यांनी भीमगीत की माला या कार्यक्रमाच्या पन्नासावा एपिसोड सादर केला

सदर कार्यक्रमास समाजभूषण मा श्री उत्तमराव दासु तरकसे असरडोहकर (महा. राज्य शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) हे वेळात वेळ काढून हजर राहिल्याने पार्श्वगायक संदेश विठ्ठल उमप यांनी त्यांचे सन्मान केल्याने श्री तरकसे यांनी कार्यक्रमाच्या १००० वा एपिसोड व्हावा अशा भरभरून शुभेच्छा दिल्या व लोकशाही विठ्ठल उमाप थेटर च्या सर्व कलाकारांचे आभार मानले कार्यक्रम अगदी जल्लोषात पार पडला रसिक प्रेक्षकांनी सभागृह अगदी खचून भरला होता कार्यक्रमाच्या शेवटी संदेश उमाप व प्रवीण डोणे यांनी प्रेक्षकांचे आभार मानत राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

# पोटात वाढलेली उष्णता क्षणार्धात होईल कमी! ‘या’ हिरव्यागार पानांच्या रसाचे नियमित करा सेवन, शरीराला होतील अनेक फायदे

जेवणातील पदार्थांची चव वाढवण्यासाठी अनेक वेगवेगळ्या मसाल्यांचा वापर केला जातो. मसाल्यांच्या वापरामुळे पदार्थाची चव वाढते. स्वयंपाक घरातील पदार्थ आरोग्यासाठी अतिशय प्रभावी असतात. त्यातील अत्यंत गुणकारी पदार्थ म्हणजे कोथिंबीर. हिरवीगार कोथिंबीर चवीसोबतच आरोग्यासाठी शुद्ध अतिशय गुणकारी आहे. जेवणातील सर्वच पदार्थांमध्ये कोथिंबीर वापरली जाते. बऱ्याचदा तिखट किंवा तेलकट पदार्थांचे सेवन केल्यामुळे पोटात उष्णता वाढणे, जळजळ होणे इत्यादी अनेक समस्या वाढू लागतात. भाजी, आमटी, कोशिंबीर, चटणी किंवा पराठा बनवताना त्यात कोथिंबीर वापरली जाते. कोथिंबीर चवीला अतिशय सुंदर लागते आणि आरोग्यासाठी सुद्धा गुणकारी आहे.





अतितिखट पदार्थांच्या सेवनामुळे पोटात उष्णता वाढू लागते. पोटात वाढलेली उष्णता कमी करण्यासाठी कोथिंबीरीचे सेवन करावे. कोथिंबीर किंवा कोथिंबिरीचा रस प्यायल्यामुळे पोटात वाढलेली जळजळ कमी होते. तसेच अपचन झाल्यामुळे छातीत जळजळ वाढण्याची जास्त शक्यता असते. याशिवाय कोथिंबिरीचा रस प्यायल्यामुळे पोटाच्या समस्या, गॅस आणि बद्धकोष्ठता कमी होण्यास मदत होते. शरीरात वाढलेले पित्त नियंत्रणात ठेवण्यासाठी कोथिंबीर खावी.

कोथिंबीरीचे शरीराला होणारे फायदे: कोथिंबीर खाल्यामुळे आरोग्य सुधारते. यामध्ये अँटी ऑक्सिडंट्स, जीवनसत्वे आढळून येतात. यासोबतच जीवनसत्त्वांमध्ये ए, सी, के, कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम इत्यादी आवश्यक घटक आढळून येतात. शरीरात साचून राहिलेली विषारी घटक बाहेर काढून टाकण्यासाठी कोथिंबिरीचा तस अतिशय प्रभावी ठरतो. यामध्ये असलेले अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल गुणधर्म आढळून येतात. आतड्यांमध्ये साचून राहिलेले हानिकारक घटक बाहेर काढून टाकण्यासाठी कोथिंबीर अतिशय गुणकारी ठरते.

कोथिंबीर खाल्ल्यामुळे शरीरात वाढलेले पित्त नियंत्रणात राहण्यास मदत होते. अपचन किंवा पित्ताच्या समस्येमुळे त्रस्त असलेल्या लोकांनी आहारात कोथिंबीर खावी. शरीरात आम्लपित्त वाढल्यानंतर उलट्या आणि पोटाचे विकार होते. हे विकार होऊ नये आहारात कोथिंबीरसोबतच थंड आणि पित्त कमी करणाऱ्या पदार्थांचे सेवन करावे.

F-Qs (संबंधित प्रश्न)

कोथिंबीरच्या बियांचे काय फायदे आहेत?

कोथिंबीरच्या बिया मसाल्यांमध्ये वापरल्या जातात आणि त्यांचे पाणी प्यायल्याने पोटाच्या समस्या, ॲसिडिटी आणि त्वचेच्या समस्यांवर आराम मिळतो, असे आरोग्य वेबसाइट्समध्ये म्हटले आहे.

कोथिंबीरचे पाणी कसे बनवायचे?

रात्री पाण्यात धणे भिजवून ठेवा आणि सकाळी ते पाणी प्या. यामुळे शरीराला अनेक फायदे मिळतात.

कोथिंबीरमध्ये कोणते पोषक तत्वे आढळतात?

कोथिंबीरमध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस, विटामिन सी आणि के भरपूर प्रमाणात असतात.

# नियमित योगामुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य सुदृढ होते – संजीवनी माने.. जडीबुटी दिवसानिमित्त तीनशे औषधी वनस्पतीचे वाटप

चाकूर : येथील विश्वशांती धाम मंदिरात पतंजली योग परिवारातर्फे आयोजित केलेल्या तीन दिवसीय योग शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना पतंजलीच्या महाराष्ट्र पूर्व प्रभारी संजीवनीताई माने यांनी नियमित योगामुळे शरीर निरोगी राहते आणि मन शुद्ध होते, असे सांगितले. नियमित योगासने केल्याने शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य सुदृढ होते, यावर त्यांनी भर दिला. पतंजली योग परिवार लातूर, महिला पतंजली आणि चाकूर पतंजली परिवाराच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात दररोज जवळपास ३०० योगसाधकांनी सहभाग घेतला आणि योगाचे धडे गिरवले. शिबिराच्या समारोपप्रसंगी संजीवनीताई माने उपस्थितांना योगाचे महत्त्व सांगितले. नियमित योगासने करणे प्रत्येकासाठी किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी सोप्या भाषेत समजावले. योग शरीर आणि मन शुद्धीकरणाची निरंतर प्रक्रिया असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. आचार्य बालकृष्ण यांच्या जन्मदिनानिमित्त 'जडीबुटी दिवस' साजरा योग शिबिराच्या समारोपाच्या दिवशी आचार्य बालकृष्णन यांचा जन्मदिवस 'जडीबुटी दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. या





निमित्ताने शिबिरात सहभागी झालेल्या सर्व ३०० योगसाधकांना विविध औषधी वनस्पतींचे वाटप करण्यात आले. जडीबुटींच्या माध्यमातून निसर्गाच्या जवळ राहून आरोग्य कसे जपले जाते, याबद्दल यावेळी माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक भंडे साहेब, योग रत्न मधुसूदन चेरेकर, शिवमूर्ती भातांबरे, प्रेमा वतनी, कलावती भातांबरे , जिल्हाप्रमुख रामराव घाडगे, सुभाष दादा काटे, सौ. मीनाक्षी स्वामी, आणि सौ. सुमन पवार, जगन्नाथ मिरकले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. बी. डी. पवार आणि सुमन पवार यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल चवळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. पवार यांनी मानले. या योग शिबिराला यशस्वी करण्यासाठी पतंजली योग समिती चाकूर, महिला पतंजली योग समिती चाकूर, आणि अहमदपूर येथील सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. यशस्वीतेसाठी धनंजय गोलावर,अमोल येरवे, गुणवंत जानकर, राजू डिगोळे ,माधव देवशेटे ,सुनीता फुलारी, केंद्रे ,नंदागवले , सुषमा सोनटक्के, महालिंगे उषा, यांनी परिश्रम घेतले.

## धनंजय पवार यांना राज्यस्तरीय डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता (ग्रंथमित्र)पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जिल्हा शासकीय ग्रंथालयात सत्कार

लातूर :- हसाळा,ता.औसा जि.लातूर येथील श्री.गुणवंतराव रामचंद्र पाटील सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय वसंतराव पवार यांना महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा राज्यस्तरीय डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता(ग्रंथमित्र)पुरस्कार (रोख ५० हजार रुपये,सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र व ग्रंथभेट)जाहीर झाल्याबद्दल जिल्हा शासकीय ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांच्या हस्ते शाल,बुके आणि अभिनंदनपत्र देवून सत्कार करण्यात आला. या प्रसंगी जिल्हा ग्रंथालय कार्यालयातील हिरा पाटील,कार्यकर्ते अशोक भोंडे आदी उपस्थित होते.धनंजय पवार यांना मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल सर्वच स्थरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. सदर पुरस्काराचे वितरण दि.१२ ऑगस्ट रोजी मुंबई प्रदान करण्यात येणार आहे,

## मायबाप सरकार युवा प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी हक्काची भाकरी द्या :- दत्तात्रय मुजमुले

### सांगली येथील बेमुदत आमरण उपोषण म्हणजे उद्रेकाची सुरूवातच

केज / प्रतिनिधी महाराष्ट्रातील महायुती सरकारने राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी निवडणुकीच्या तोंडावर सहा महिन्यांसाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी म्हणून योजना काढली. त्यात अनेक तरुणांना अल्प रोजगार मिळाला.मात्र सरकारने त्यापुढे फक्त पाच महिन्याचा कालावधी वाढवत सुशिक्षित बेरोजगार तरुण तरुणींचे भविष्य अंधारात ढकलले आहे.

सरकारने राज्यातील अंदाजे १ लाख ३४ हजार मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थींना वाऱ्यावर सोडत आहेत.बेरोजगार तरुणांच्या हाताला काम नाही, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.पुढे पाच महिने वाढीव देण्यात आले असून भविष्यात मात्र कालावधी वाढवणार नसल्याचे मुख्यमंत्री यांनी सांगितले आहे. राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व



त्या खात्याचे मंत्री हे युवा प्रशिक्षणार्थींच्या भावनेशी खेळत आहेत. प्रशिक्षणार्थींना हे सरकार फसवत आहेत. युवा प्रशिक्षणार्थींना हक्काची कायमस्वरूपी भाकरी मिळवून देण्यासाठी सांगली जिल्ह्यातील कृष्णामाईच्या घाटावर महाराष्ट्र राज्य युवा प्रशिक्षणार्थी कृती समितीचे तुकाराम बाबा महाराज हे पाच दिवस आमरण उपोषणाला बसले होते.ही युवा प्रशिक्षणार्थींनच्या उद्रेकाची सुरूवात आहे.

तरी सरकारने राज्यातील युवा प्रशिक्षणार्थी यांच्या मागण्या गांभीर्याने घेऊन राज्यातील युवा प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी हक्काची भाकरी द्यावी अशी मागणी युवा प्रशिक्षणार्थी तथा पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केली आहे.

# आता बीड जिल्ह्यात गुजरात राज्यातील वेशा !

केज/प्रतिनिधी लोकनाट्य तमाशाच्या नावाखाली केज तालुक्यात सारूळ फाटा येथे सुरू असलेल्या कला केंद्रावर गुजरात राज्यातील वेशा बोलावून वेशा व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी छापा टाकून कला केंद्राचा मालक आणि इतर दोघांना ताब्यात घेत त्या महिलांची सुटका केली आहे. याबाबतची माहिती अशी की, केज मांजरसुंबा हायवे वर असलेल्या केज तालुक्यातील सारूळ फाटा येथील रेणूका कला केंद्रात लोकनाट्य तमाशाच्या नावाखाली वेशा व्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या मिळालेल्या माहिती वरून दि. ५ ऑगस्ट रोजी रात्री ८:०० च्या सुमारास बीड येथील अनैतिक मानवी वाहतूक शाखेने जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांना माहिती देऊन त्यांच्या आदेशाने अनैतिक वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक, देवीदास भागवत गात, पोलिस उपनिरीक्षक पल्लवी जाधव, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक मिरा



रेडेकर, महिला पोलिस आशा चौरे, शोभा जाधव, हेडकॉन्स्टेबल शिंदे, येवले, वीर आणि वाहन चालक निर्धार यांनी बनावट गिऱ्हाईक पाठवून धाड टाकली. त्यावेळी बनावट गिऱ्हाईकसह त्या ठिकाणी गुजरात राज्यातील एक वर्षीय ३२ तरुणी आणि तिच्या सोबत असलेली ३० वर्षीय तरुणी आढळून आली. पोलिसांनी त्या दोघींचे जवाब नोंदवून त्यांची सुटका केली आणि रेणुका कला केंद्राचा मालक रामनाथ ढाकणे, मॅनेजर शेख शफीक शेख हमीद, आणि पार्टीची मालकीण मिना संतोष खराडे यांच्या विरुद्ध पोलिस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांच्या तक्रारी वरून केज पोलीस ठाण्यात गु र नं ४२६/२०२५ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५,६ यासह भा. न्या. सं.१४३(२),१४३(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याचा तपास पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे हे तपास करीत आहेत.

मॅनेजर आणि पार्टी मालकीण पोलिसांच्या ताब्यात मात्र मालक फरार :- पोलिसांनी केलेल्या कारवाईत कला केंद्राचा मॅनेजर शेख शफीक शेख हमीद, आणि पार्टीची मालकीण मिना संतोष खराडे यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे मात्र रेणुका कला केंद्राचा मालक रामनाथ ढाकणे हा फरार असून पोलिस त्याचा तपास घेत आहेत.

अनेक कारणांनी बदनाम असलेले कला केंद्र :- रेणुका कला केंद्र हे अनेक कारणांनी बदनाम झालेले आहे. १) २७ जानेवारी २०१९ मध्ये याच रेणुका कला केंद्रावर पोलिसांनी छापा टाकून १६ जणांना ताब्यात घेऊन महिलांची सुटका करण्यात करण्यात आली होती. कला केंद्राचा रामनाथ ढाकणे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. २) या कला केंद्रात काम करीत असलेली शितल कांबळे हिचा बरड फाट्यावरील राजयोग लॉज मध्ये नेवून खून केला तो तो खून तत्कालीन सहाय्यक पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांनी सुमारे दोन महिन्या नंतर उघडकीस आणून रामनाथ ढाकणे यांच्यासह तिघांवर गुन्हा दाखल केला होता. ३) या कला केंद्रात नर्तकी म्हणून काम करीत असलेला तृतीय पंथी गार्गी ढलपे हिने मस्साजोग येथील अजिंक्य लॉज मध्ये ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली होती.

## राहुल गांधींना दिलासा ; अमित शहांवरील टिप्पणी प्रकरणी जामीन मंजूर

कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांना आज मानहानीच्या प्रकरणात जामीन मिळाला. झारखंडच्या चाईबासा खासदार-आमदार न्यायालयाने त्यांना दिलासा दिला. राहुल यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर वादग्रस्त टिप्पणी केली होती, त्यानंतर भाजप नेते प्रताप कटिहार यांनी मानहानीचा खटला दाखल केला. हा संपूर्ण वाद २०१८ सालचा आहे. राहुल यांनी कॉंग्रेस अधिवेशनादरम्यान एक विधान केले होते.राहुल गांधी आज सकाळी न्यायालयात हजर झाले. एका वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, कॉंग्रेस खासदार राहुल गांधींच्या वकिलांनी, झारखंड उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार राहुल गांधी न्यायालयात हजर झाले. त्यांनी जामीन मागितला होता जो मंजूर करण्यात आला. आता आम्ही प्रक्रिया पुढे नेऊ. असे म्हटले आहे. संपूर्ण प्रकरण काय होते? राहुल यांनी २८ मार्च २०१८ रोजी कॉंग्रेस अधिवेशनादरम्यान तत्कालीन भाजप राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांच्यावर वादग्रस्त विधान केले होते. त्यानंतर, ९ जुलै २०१८ रोजी प्रताप कटिहार यांनी चाईबासा न्यायालयात मानहानीचा खटला दाखल केला. या प्रकरणात राहुल यांना अनेक वेळा समन्स बजावण्यात आले होते, परंतु ते हजर राहिले नाहीत. तथापि, ते निश्चितच बुधवारी पोहोचले. महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा खटला प्रथम चाईबासा सीजेएम कोर्टातून रांची एमपी-एमएलए स्पेशल कोर्टात हलवण्यात आला, परंतु त्यानंतर तो चाईबासा एमपी-एमएलए कोर्टात आला.

# अमेरिकेच्या नॅशनल कॉन्फरन्स ऑफ स्टेट लिजिस्लेटर्समध्ये भारतातील २४ राज्यातून १३० आमदारांचा सहभाग

लातूर :- जागतिक पातळीवर लोकशाही संवाद बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, भारतीय विधिमंडळातील १३० हून अधिक सदस्यांचे एक शिष्टमंडळ ४ ते ६ ऑगस्ट २०२५ दरम्यान अमेरिकेच्या बोस्टन शहरात होणार्या नॅशनल कॉन्फरन्स ऑफ स्टेट लिजिस्लेटर्स समिटमध्ये सहभाग घेत आहे. या उपक्रमाची माहिती एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट चे डॉ. परिमल माया सुधाकर (एनएलसी भारत) यांनी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या ऐतिहासिक सहभागासाठी नॅशनल लिजिस्लेटर्स कॉन्फरन्स भारत या मंचाने पुढाकार घेतला असून, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचे मार्गदर्शन लाभले. एनएलसी भारत हे भारतीय लोकप्रतिनिधींना सक्षम करणारे आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर विधिमंडळीय सहकार्य, संवाद व चांगल्या कार्यपद्धतींचे आदानप्रदान घडवून आणणारे एक अग्रगण्य व्यासपीठ आहे. या शिष्टमंडळात देशभरातील २४ हून अधिक राज्यांमधून आलेले आमदार आणि विधान परिषदेचे सदस्य सहभागी असून, हे प्रतिनिधी २१ वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे प्रतिनिधित्व करतात. हे शिष्टमंडळ भारताच्या समावेशक, लोकशाही आणि वैविध्यपूर्ण नेतृत्वाचे प्रतीक आहेत. सीमापार ज्ञानविनिमय, विधिमंडळीय कार्यक्षमता वाढवणे, तसेच शासन व कायदेप्रक्रियेसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उत्तम पद्धतींचा थेट अनुभव घेणे. हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून या उपक्रमाची सुरुवात २०२४ मध्ये अमेरिका येथे झाली. हा स्वतंत्र भारताच्या इतिहासात एक वेगळा उपक्रम होता, ही चळवळ अधिक बळकट होत असून एकूण १३० लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते.

दोन दिवसांमध्ये शिष्टमंडळाने अनेक महत्त्वपूर्ण कार्यक्रमांत सहभाग घेतला. बोस्टन कन्वेन्शन ॲण्ड एक्झिबिशन सेंटरमध्ये झालेल्या जनरल सेशनमध्ये त्यांनी उपस्थिती लावली. त्यानंतर आरोग्य सेवा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि वाहतूक व्यवस्था यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरील सत्रांमध्येही सहभाग नोंदवला. मॅसेच्युसेट्स स्टेट हाऊसला शैक्षणिक भेट दिली, ज्यामध्ये तेथील विधानप्रक्रिया व इतिहास याचा अभ्यास करण्यात आला. या दौर्यात, श्री. वेन हार्पर यांच्याशी झालेल्या औपचारिक संवादातून दोन्ही देशांतील संस्थात्मक संबंध अधिक दृढ झाले. या दौर्यादरम्यान, शिष्टमंडळाने विविध राज्यांतील आणि इतर देशांतील विधिमंडळ सदस्यांशी संवाद साधला, त्यातून आंतरराष्ट्रीय सहकार्य व परस्पर समजूत वाढवण्याचा मार्ग मोकळा झाला. मुंबईत २०२३ मध्ये पार पडलेल्या एनएलसी भारतच्या पहिल्या परिषदेनंतर, हा दौरा निरपेक्ष, माहितीवर आधारित व पक्षभेदापलीकडचा लोकशाही संवाद वाढवण्यासाठी आखलेल्या दीर्घकालीन दृष्टिकोनाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या समिटमध्ये भारतीय लोकप्रतिनिधी २,००० हून अधिक अमेरिकी आणि ७,००० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींसोबत सहभागी होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता व प्रशासन, डिजिटल लोकशाही, सायबर सुरक्षा, मतदारांचा विश्वास आणि धोरणात्मक नवकल्पना हे चर्चेचे विषय आहेत. एनएलसी भारतचे संस्थापक डॉ. राहुल कराड यावेळी म्हणाले, हे केवळ एक शिष्टमंडळ नाही, तर भारताच्या लोकशाही शक्तीचे आणि विविधतेतील एकतेचे जिवंत प्रतीक आहे. एवढ्या व्यापक प्रमाणावर आमदार व विधान परिषदेचे सदस्य आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रथमच एकत्र आले आहेत. हे प्रतिनिधी जेव्हा या व्यासपीठावर



पाऊल ठेवतात, तेव्हा केवळ वैयक्तिक आकांक्षा नाही, तर अब्जावधी नागरिकांची आशा आणि आपल्या प्राचीन संस्कृतीचे प्रतिनिधित्व ते करतात. आमचा हेतू साधा पण प्रभावी आहे – जगभरातील लोकशाहींच्या दरम्यान बंध निर्माण करणे, परस्पर शिकणे आणि उत्तम प्रशासनासाठी संवाद सुरू ठेवणे. या दौर्यात अमेरिकन विधिमंडळ व्यवस्थेवर आधारित शैक्षणिक सत्रे, स्थानिक संस्था व विधानसभांना भेटी, तसेच राजकारण, शिक्षण व उद्योग क्षेत्रातील भारतीय वंशाच्या नेतृत्वाशी संवाद यांचा समावेश आहे. या सहभागामागील प्रमुख उद्देश आहे जगातील दोन सर्वात मोठ्या लोकशाहींमध्ये अर्थपूर्ण संवाद घडवणे आणि भारतीय वंशीय समुदायांशी संबंध दृढ करणे. बोस्टनमधील हे शिष्टमंडळ भारतीय लोकप्रतिनिधींसाठी नियोजित आंतरराष्ट्रीय अनुभववृद्धी कार्यक्रमांच्या मालिकेतील एक भाग आहे. येत्या काळात आशिया, युरोप आणि अमेरिका खंडांतील इतर देशांमध्ये अशा दौर्यांचे आयोजन होणार आहे. या सहकार्याधारित सहभागाच्या मॉडेलमधून एनएलसी भारतचे उद्दिष्ट आहे – एक सशक्त, माहितीपूर्ण, आणि जागतिक स्तरावर जोडलेले विधिमंडळीय वातावरण तयार करणे, जे भारताच्या लोकशाही मूल्यांना बळकटी देईल आणि भारताला जागतिक लोकशाही नवोन्मेषाचा अग्रदूत म्हणून प्रतिष्ठा मिळवून देईल.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE